# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
# उल्हासनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र : २७२०११६,    विस्तारीत क्र. : २०८    फॅक्स नं : ०२५१.२७२०१०४

जाक्रउमपा/साप्रवि/आस्था/मुली/ ९९० /२०२२    दिनांक - १० /१०/२०२२

## -:जाहिरात:-

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांची कमतरता असल्याने स्थानिक संस्था कर विभागातील प्रलंबित निर्धारणा व अनुषंगीक कामांची पुर्तता करणेकामी वर्ग—२ मधील सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी/आयकर अधिकारी किंवा संनदी लेखापाल **यांची** शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार मानधन तत्वावर ०६ महिन्यासाठी नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी दिनांक १२ /१०/२०२२ ते २०/१०/२०२२ रोजी (सकाळी ११.०० वाजता ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी सदर कालावधीमध्ये सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये दिनांक १२ /१०/२०२२ ते २०/१०/२०२२ रोजी (सकाळी ११.०० वाजता ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज सादर करावे.

| अ.क्र. | तपशिल | पद संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी/आयकर अधिकारी किंवा संनदी लेखापाल | ०२ | दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार |

**अटी व शर्ती :—**

१) सोबतच्या नमुन्यातील परिपुर्ण भरलेला अर्ज उमेदवाराने सदर कालावधीमध्ये अर्ज सादर करावा.

२) शासकीय सेवेतील सेवा निवृत्तीबाबतचे ओळखपत्र व अंतिम वेतनदाखला (सेवानिवृत्तीपुर्वीचे वेतनदाखला), जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगीक इतर कागदपत्रांच्या मुळ व साक्षांकित प्रती, पासपोर्ट साईज २ फोटो.
कोणत्याही कारणामुळे मूळ कागदपत्रांशिवाय मुलाखतीस पात्र ठरविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच मुलाखतीवेळी सादर केलेल्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र खोटे/चूकीचे आढळल्यास संबंधित उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

३) निवड होणा-या उमेदवारास १५ दिवसाच्या आत नियुक्ती देण्यात येईल. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही प्रकरची गैरवर्तणूक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

४) सदरहु काम स्थानिक संस्था कर विभागातील प्रलंबित निर्धारणा व अनुषंगीक कामाची पुर्तता करणेकामी असेल.

५) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा नियुक्तीनुसार ग्राहय धरण्यात येईल.

६) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

७) नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखून ठेवले आहे.

८) सदर जाहिरात उल्हासनगर महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.umc.gov या संकेत स्थळावर उपलब्ध असुन, सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदरहु संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**इतर अटी व शर्ती :-**

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

दिनांक - १० /१०/२०२२

(अशोक नाईकवाडे)
उप आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
# उल्हासनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र : २७२०११६, विस्तारीत क्र. : २०८ फॅक्स नं : ०२५१.२७२०१०४

जाक्रउमपा/साप्रवि/आस्था/मुली/९८८/२०२२ दिनांक :- १०/१०/२०२२

## -:जाहिरात:-

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी यांची कमतरता असल्याने स्थानिक संस्था कर विभागातील प्रलंबित निर्धारणा व अनुषंगीक कामांची पुर्तता करणेकामी वर्ग–२ मधील सेवानिवृत्त विक्री कर अधिकारी / आयकर अधिकारी किंवा संनदी लेखापाल यांची शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ नुसार मानधन तत्वावर ०६ महिन्यासाठी करावयाची आहे. त्यासाठी दिनांक १२ /१०/२०२२ ते २०/१०/२०२२ रोजी (सकाळी ११.०० वाजता ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी दिनांक १२ /१०/२०२२ ते २०/१०/२०२२ रोजी (सकाळी ११.०० वाजता ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) अर्ज सादर करावे.

सदर भरती प्रक्रिया संदर्भात संपुर्ण माहिती, अर्ज व जाहिरात महापालिकेच्या www.umc.gov या संकेत स्थळावर व महापालिका मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे. तसेच या भरती प्रक्रियेबाबत माहिती वेळोवेळी संकेत स्थळावर व महापालिका मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध करण्यात होईल.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

दिनांक - १० /१०/२०२२

(अशोक नाईकवाडे)
उप आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका